अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

जा.क्र.अम / सका - २ / २००९.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक :  १६ -०१ -२००९.

अहमदनगर महानगरपालिकेच्या खास सभेची सुचना.

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ - नियम क्र. १ (ड) अन्वये.)
सभा सुचना क्रमांक २ , दिनांक  २०-०१-२००९.

प्रति,
सन्मा.श्री. / श्रीमती..............................................................

सदस्य / सदस्या,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

महोदय,

यांस-

याद्वारे कळविण्यांत येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ - नियम क्र. १ (ड) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची खास सभा मंगळवार दिनांक २०-०१-२००९ रोजी दुपारी १-०० वाजता नविन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील सभागृहात सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

सोबत : १. विषय सूची.
२. प्रस्तावाची टिप्पणी.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

सभा क्रमांक २ दिनांक २०-०१-२००९ रोजी दु. १.०० वां होणा-या मा.खास सभेची विषय पत्रिका.

**-- *--**

| विषय क्रमांक | विषय |
|---|---|
| २ | महाराष्ट्र शासनाचे नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांनी दिनांक १५ नोव्हेंबर २००८ रोजी अधिसुचनाव्दारे सुचित केल्यानुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीत स्थानिक परिस्थितीचा विचार करुन उपयोग, उपभोग किंवा विक्री यासाठी शहरामध्ये होणा-या मालाच्या प्रवेशावर जकाती ऐवजी उपकर बसविण्याचा दिनांक निश्चित करण्याचा उचित निर्णय घेणे बाबत. |
| ३ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा.महापौर यांचे मान्यतेने.
दिनांक : १६-०१-२००९.

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : २ दिनांक : २०-०१-२००९.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :-** महाराष्ट्र शासनाचे नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांनी दिनांक १५ नोव्हेंबर २००८ रोजी अधिसुचनाव्दारे सुचित केल्यानुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीत स्थानिक परिस्थितीचा विचार करुन उपयोग, उपभोग किंवा विक्री यासाठी शहरामध्ये होणा-या मालाच्या प्रवेशावर जकाती ऐवजी उपकर बसविण्याचा दिनांक निश्चित करण्याचा उचित निर्णय घेणे बाबत...

-- ** --

**प्रस्तावाचा मजकुर :-** मा.उपायुक्त (सा.) यांनी जा.क्र./सा.प्र.वि./पी.ए./३२४९ दि. १८/११/०८ अन्वये सन-२००९-२०१० यावर्षाकरीता जकात वसुलीकरणे कामी जकात अभिकर्ता नेमणे कामी जाहीर निविदा मागविण्याबाबत कार्यवाही करणेबाबत आदेशीत केलेले आहे.

मा.स्थायी समिती ठराव क्र. १ दि. ११/२/२००७ अन्वये दि. १/४/२००७ ते ३१/३/२००८ या एक वर्षाचे कालावधीसाठी ठेक्याची रक्कम रू. ४३,६१,४५,४००/- (रूपये त्रेचाळीस कोटी एकसष्ठ लाख पंचेचाळीस हजार चारशे फक्त) एवढी निश्चीत करून जकात अभिकर्ता नेमणुकीसाठी जाहीर निविदा मागविण्यात आल्या होत्या त्यामध्ये निविदा मधील सर्व अटींची पुर्तता करून सर्वात जादा रकमेची निविदा मे. सहकार एजन्सीज प्रा.लि. मालाड, मुंबई यांची निविदा मंजुर करण्यात आली होती. त्यामध्ये देकार रक्कम पुढील प्रमाणे निश्चीत केली होती.

| | | |
|---|---|---|
| १ | दि. १/४/२००७ ते ३१/३/२००८ या कालावधीसाठी निश्चीत केलेली देकार रक्कम रूपये. | रू.४७,१६,००,०००/- |
| २ | अ.नगर महानगरपालिका हद्दीतील नागापुर स.नं. ९ ते २१ एम.आय.डी.सी. मधील एल. व एम. ब्लॉक व इतर प्लॉट म.न.पा. हद्दीतुन वगळणे बाबत शासनाचा निर्णय होई पावेतो ठेक्याच्या दि. १/४/२००७ ते ३१/३/२००८ या कालावधीमध्ये रू. ५९,९२,०१२/- या रक्कमेच्या प्रमाणात भरून घ्यावयाची एकुण रक्कम रूपये. | रू. ५९,९२,०१२/- |
| ३ | अ.नगर महानगरपालिकेची २०,००० चौ.फु. क्षेत्राची प्रशासकीय इमारत बांधुन देणे त्याबाबत निश्चीत केलेली रक्कम रूपये. | रू. १,२५,००,०००/- |

मा.स्थायी समिती ठराव क्र. ३ दि. २०/३/२००७ अन्वये वरील प्रमाणे देकार रक्कम निश्चीत करून दि. १/४/२००७ ते ३१/३/२००८ या एक वर्षाचे कालावधी करीता मे. सहकार एजन्सीज प्रा.लि. मालाड, मुंबई यांची जकात अभिकर्ता म्हणुन नेमणुक करण्यात आली होती. सदर ठेक्याचा एक वर्षाची कालावधी दि. ३१/३/२००८ रोजी संपुष्टात आल्याने, सन २००८-०९ या वर्षाकरिता दि. १/४/२००८ ते ३१/३/२००९ या एक वर्षाचे कालावधीकरीता

जकात वसुली करणेकामी ठेका देण्यासाठी जाहीर निविदा मागविणेकामी देकार रक्कम पुढील प्रमाणे निश्चीत करण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| १) | सन २००८-२००९ या एक वर्षाचे कालावधीसाठी वार्षीक ठेक्याची रक्कम ठरविण्यासाठी विचारात घ्यावयाची सन २००७-२००८ या वर्षाची देकार रक्कम रूपये. | रू. ४७,१६,००,०००/- |
| २) | अ.नगर महानगरपालिका क्षेत्रातील एम.आय.डी.सी. मधील एल. व एम.ब्लॉक मधील जकातीचे दि. १/४/०७ ते १४/१/२००८अखेर प्राप्त उत्पन्न रूपये. | रू. ४९,४७,७२१/- |
| ३) | एकुण प्रत्यक्ष प्राप्त उत्पन्न (१+२ = ३) | रू. ४७,६५,४७,७२१/- |
| ४) | मे. शासन निर्णय क्र. जीईएन १०९४/प्र.क्र. १४३/नवि-२४दि. ३ मार्च १९९५ अन्वये उक्त रक्कमेत शेकडा १० % ने वाढवुन येणारी रक्कम रूपये. | रू. ४,७६,५४,७७२/- |
| ५) | एक वर्षासाठी एकुण निव्वळ जकातीपोटी ची अपेक्षीत रक्कम (३+ ४ = ५) | रू. ५२,४२,०२,४९३/- |
| ६) | कटक मंडळ भिंगार (कॅन्टोन्मेंट बोर्ड) यांना संयुक्त जकात वसुलीकामी द्यावयाची हिस्सा वर्गणी रक्कम रूपये. | रू. १००,००,०००/- |
| ७) | एकुण अपेक्षीत उत्पन्न (५+६ = ७) | रू. ५३,४२,०२,४९३/- |
| ८) | महाराष्ट्र शासनाचे नगर विकास विभागाकडील निर्णय क्र.ए.एम.सी. १००४/४९/प्र.क्र.५५/०४/नवि-२४ दि. १५/१/२००८ अन्वये अ.नगर महानगरपालिका हद्दीतील एम.आय.डी.सी. नागापुर स.नं. ९ ते २१ मधील एल. व एम. ब्लॉक व इतर प्लॉट हे दि. १५/१/०८ पासून म.न.पा. हद्दीतुन वगळण्यात आलेले असल्याने त्या भागातील अपेक्षीत उत्पन्न वजा करावे लागेल.<br>(४९४७७२१ + १०%वाढ ४९४७७२ =५४४२४९३/-) | रू. ५४,४२,४९३/- |
| ९) | सन-२००८-२००९ या आगामी वर्षासाठी निश्चीत करावयाची किमान देकार रक्कम रूपये.<br>(७ - ८ =९) | रू. ५२,८७,६०,०००/- |

मा.शासनाचे निर्णय क्र. जीईएन १०९४ /प्र.क्र. १४३/ नवि-२४ दि. ३ मार्च १९९५ अन्वये निविदेमध्ये शेकडा १० टक्के वाढ दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | वर्ष | जकात किमान देकार रक्कम | जकात अभिकर्त्याद्वारे निविदा प्राप्त देकार रक्कम |
|---|---|---|---|
| १) | १/१०/२००५ ते ३०/९/२००६ | रू. ३३,११,६३,३०८/- | रू. ४०,४१,००,०००/- |
| २) | १/१०/२००६ ते ३१/३/२००७ अखेर सहा महिन्यांकरिता | रू. १९,२०,९४,५४६/-<br>+ कॅन्टोन्मेंट जकात हिस्सा १५,००,०००/-<br>एकुण १९,३५,९४,५४६/-<br>वार्षिक देकार रक्कम रु, ३८,७१,८९,०९२/- | रू. १९,३५,९४,५४६/- |
| ३) | १/४/०७ ते ३१/३/०८ | रू. ४३,६१,४५,४००/- | रू. ४७,१६,००,०००/- |
| ४) | १/४/०८ ते ३१/३/०९ | रू. ४३,६१,४५,४००/-<br>+ १०%वाढ ४३,६१,४५,४०/-<br>एकुण- रू. ४७,९७,५९९,४०/- | रू. ५२,८७,००,०००/-<br>(एकच निविदा आल्याने मा. शासनाच्या आदेशान्वये कर्मचा-यांमार्फत जकात वसुल करण्यात येत आहे.) |
| ५) | १/४/०९ ते ३१/३/२०१० | रू. ४७,९७,५९९,४०/-<br>+ १० टक्के ४७,९७,५९९४/-<br>रू. ५२,७७,३५,९०४/-<br>म्हणजेच ५२,७७,५०,०००/- | रू. ५२,८७,६०,०००/-<br>+१०टक्के वाढ-५२,८७,६०,००/-<br>एकुण- रू. ५८,१६,३६,०००/- |

वरीलप्रमाणे म.न.पा. ची मा.शासनाचे दि. ३ मार्च १९९५ चे निर्णयानुसार प्रतिवर्षे १० टक्के वाढ धरून किमान देकार रक्कम रू. ५२,७७,३५,९०४/- म्हणजेच ५२,७७,५०,०००/- अशी येत आहे. तसेच जकात अभिकर्ता यांचे मार्फत निविदा मागविणे करीता रू. ५८,१६,३६,०००/- यानुसार देकार रक्कम निश्चीत करणे योग्य वाटते.

याबाबत मालेगांव महानगरपालिका विरूध्द जकात अभिकर्ता यांनी रिट याचीका क्र. ३१/२००५ दाखल केली होती सदर याचीका मा.उच्च न्यायालयाने फेटाळलेली आहे. त्यामुळे म.न.पा. ने निश्चीत केलेली देकार रक्कम योग्य आहे अशाबाबत निर्णय दिलेला आहे.

मा.स्थायी समिती ठराव क्र.११ दिनांक १६/०२/२००८ अन्वये वरील देकार रक्कम रु.५२,८७,६०,०००/- (रुपये बावन्न कोटी सत्याऐंशी लाख साठ हजार फक्त) एवढी देकार रक्कम निश्चीत करुन सन २००८-२००९ या वर्षाकरीता दिनांक ०१/०४/२००८ ते ३१/०३/२००९ या कालावधीसाठी जकात अभिकर्ता नेमणुक करणे कामी जाहीर निविदा मागविणे बाबत मान्यता देण्यात आली होती, त्यानुसार जाहीर निविदा मागविण्यात आल्या होत्या, मुदतीत फक्त एकच निविदा मे.सहकार एजन्सीज प्रा.लि.मालाड, मुंबई यांची निविदा प्राप्त झाली होती.

तथापि दरम्यानच्या काळात महाराष्ट्र शासनाने जकात बंद करुन उपकर लागु करणे बाबत अर्थ संकल्पात घोषणा केल्यामुळे सदर निविदावर निर्णय न घेता स्थगीत ठेवण्यात आली होती, तसेच जकात वसुली बाबत मा.शासनाकडे जा.क्र.४३७५ दि.२४/०३/२००८ अन्वये मार्गदर्शन मागविण्यात आले होते,

त्यावर मा.शासनाने महानगरपालिका कर्मचा-यांमार्फत जकात वसुल करावी असे कळविलेले होते. त्यानुसार दि.०१/०४/२००८ पासुन अ.नगर महानगरपालिका कर्मचा-यांमार्फत जकात वसुलीचे काम चालु आहे.

महाराष्ट्र शासनाचे नगरविकास विभाग यांनी दि.१५ नोव्हेंबर २००८ रोजी अधिसुचना प्रसिध्द केली आहे. त्यामध्ये महानगरपालिकांनी स्थानिक परिस्थितीचा विचार करुन ठरावाव्दारे उपयोग उपभोग किंवा विक्री यासाठी शहरामध्ये येणा-या मालाच्या प्रवेशावर जकात ऐवजी उपकर बसविण्याचा दिनांक निश्चीत करण्याचा उचीत निर्णय त्यांचे स्तरावर घ्यावा. तोपर्यंत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम १२७ च्या उपकलम २ (अ) नुसार जकात लावण्याची मुभा राहील असे नमुद केलेले आहे. यावर महासभेमध्ये धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे.

तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १२७ च्या उपकलम २(अ) नुसार जकात सुरु ठेवण्याचा निर्णय झाल्यास मंजुर निविदेच्या कार्यादेशाच्या तारखेपासुन १२ महिन्यांचे कालावधीसाठी जकात वसुलीकामी जकात अभिकर्ता यांची नेमणुक करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या उतपन्नाचे दृष्टीने आर्थिकदृष्टया लाभाचे आहे. कारण खाजगी तत्वावर असलेल्या यंत्रणा म्हणजे कर्मचारी यांचे वेतन, वाहने व इतर तदनुषंगीक खर्च संगणीकरण, दुरध्वनी, भ्रमणध्वनी यंत्रणा या बाबींची प्रशासनाकडुन पुर्तता करावी लागते तसेच शहरात असणा-या जगात चोरीचा अनुभव पाहता पुर्णपणे बिमोड प्रशासनाकडुन होवु शकत नाही. तसेच याकामात वारंवार होणारे हस्तक्षेप व अडथळे यांना पायबंध घालता येणार नाही. त्यामुळे महानगरपालिकेमार्फत जकात वसुलीचे काम केल्यास ठेकेदाराकडुन मिळणा-या अपेक्षीत उत्पन्नापेक्षा कमी उत्पन्न मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही. जकात वसुली ठेका पध्दतीने दिल्यास अपेक्षीत उत्पन्नापेक्षा अधिक रक्कम मिळु शकते हे मागील कालावधीमध्ये दिलेल्या ठेक्यावरुन सिध्द होते. महानगरपालिकेचे जकात विभागाकडील कर्मचारी हे इतर विभागांत वापरण्यात येवुन नागरिकांना सुविधा देणे, घरपट्टी वसुल करणे इत्यादी कामी त्यांच्या सेवा उपलब्ध करुन घेता येईल.

मा.आयुक्त साहेब यांच्याशी दि.२४/११/०८ रोजी झालेल्या चर्चेनुसार वरील वस्तुस्थिती विचारात घेता जकात वसुली कामी मंजूर निविदेच्या कार्यादेशाच्या तारखेपासुन १२ महिन्यांकरीता ठेका पध्दतीने देण्यासाठी जकात अभिकर्ता नेमणे संयुक्तीक होईल. या कालावधीसाठी ठेक्याची रक्कम पुढील प्रमाणे निश्चीत करता येईल.

| अ.नं. | विषय | रक्कम |
|---|---|---|
| १ | सन २००८-२००९ मध्ये अपेक्षीत केलेली रक्कम | रु.५२,८७,६०,०००/- |
| २ | मे.शासन निर्णय क्र.जीईएन १०९४/प्र.क्र.१४३/नवि-२४ दि.३ मार्च १९९५ अन्वये १०% वाढ धरुन येणारी रक्कम | रु.५८,१६,३६,०००/- |
| ३ | प्रतीमहा अपेक्षीत जकातीचे उत्पन्न | रु.४,४८,६९,६६६/- |

तरी पुढील १२ महिन्यांचे कालावधीसाठी ठेका देण्यासाठी अपेक्षीत केलेली देकार रक्कम रु.५८,१६,३६,०००/- एवढी देकार रक्कम निश्चीत करणे बाबत योग्य तो निर्णय घेवुन पुढील कालावधीकरीता जकात अभिकर्ता नेमणुक करणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ३५ अन्वये मा.स्थायी समितीच्या मान्यतेने जकात अभिकर्ता निश्चीत करता येईल. सदर प्रस्तावास मान्यता देताना खालील अतिरिक्त अटी व शर्ती करारात समाविष्ट करणे उचीत वाटते.

१) जकात अभिकर्ता नेमणुकीसाठी निविदा धारकास पुर्वीचा किमान एक वर्षाचा अनुभव व एक वर्षात किमान तीस कोटी रक्कमेचा जकात वसुलीचा अनुभव असावा.

२) जकात अभिकर्ता नेमणुकीसाठी निविदा धारकाने पुर्ण झालेल्या लगतच्या मागील तीन वर्षात म्हणजेच सन २००५-२००६, २००६-२००७, २००७-२००८ या प्रत्येक वर्षात किमान देकार रक्कमे इतक्या आर्थिक रक्कमेची उलाढाल केलेली असावी. व त्यासाठी तीन वर्षाचे लेखापरीक्षण करण्यात आलेले लेखा विवरण पत्र सादर करणे आवश्यक आहे.

३) जकात अभिकर्ता नेमणुकीसाठी निविदा धारकांची भांडवली स्थिती किमान देकार रक्कमेच्या किमान ५% इतकी असावी व त्यासाठी सन २००७-२००८ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करण्यात आलेले लेखा विवरण पत्र सादर करणे आवश्यक आहे.

४) संयुक्तपणे (जॉइंट व्हेंचर) अन्वये सादर केलेली निविदा ग्राह्य धरण्यात येवु नये.

५) निविदे सोबत बयाणा रक्कम ही नियमानुसार भरुन घेण्यात यावी. अनामत रक्कम भरुन घेताना बँक गॅरेंटी किंवा धनादेश किंवा रोख स्वरुपात स्विकारणे बाबत कार्यवाही करताना मुळ कागदपत्रे सादर करणे बंधनकारक ठेवावे. तसेच सदर कार्यवाही किमान एक दिवस अगोदर होणे आवश्यक आहे.

६) कोणत्याही प्रकारे देकार रक्कम कमी प्राप्त झाली तर त्या अन्वये जकात अभिकर्ता नियुक्त करणे अथवा नाकारणे बाबत महानगरपालिका मा.शासनाच्या मार्गदर्शनानुसार कार्यवाही करु शकेल.

७) आय.टी.पार्क साठीच्या सवलतीचा मोबदला ठेकेदारास अनुज्ञेय असणार नाही.

८) काचेच्या बांगडयावरील जकात कर माफीस मा.शासनाने मान्यता दिल्यास त्याकामी दिल्या जाणा-या सवलतीचा मोबदला ठेकेदारास अनुज्ञेय असणार नाही.

९) औरंगाबाद रोड येथील बोट टाईप गेस्ट हाउस येथे चालु असलेलया अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीच्या दुस-या मजल्याचे संपुर्ण बांधकाम (दारे, खिडक्या, फरशी व इलेक्ट्रीक फिटींग इत्यादीसह) ठेक्याच्या कालावधीमध्ये पुर्ण करुन देणा-यास निविदेत प्राधान्य देण्यात येईल. सदर बांधकामाचा खर्च रु.एक कोटी चाळीस लाख फक्त (रुपये १.४० कोटी मात्र) अपेक्षीत राहील. तरी शासनाचे राजपत्रातील १५ नोव्हेंबर २००८ च्या राजपत्रातील क्र.सीईएस-०२०८/प्र.क्र.५७/नवि-३४ तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १२७ (२)(अ) अन्वये जकात लागु करण्यास मुभा दिलेली आहे त्यामुळे पुढील १२ महिन्याच्या कालावधीसाठी देकार रक्कम निश्चिती बाबत निर्णय घेणे.

तसेच स्थानिक परिस्थिती विचारात घेवुन जकात ऐवजी उपकर बसविण्याचा दिनांक निश्चित करण्याचा उचित निर्णय मा.महासभेने घेणेसाठी त्याचप्रमाणे निविदा कामी येणा-या खर्चास मंजुरी मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव महासभेपुढे धोरणात्मक निर्णयास्तव सादर करणे बाबत पुढील आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की, महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाची अधिसूचना दिनांक १५ नोव्हेंबर २००८ अन्वये " ड " वर्ग महानगरपालिकांना जकात लावण्याची मुभा दिली असल्याने सन २००९-२०१० या वित्तीय वर्षासाठी जकात अभिकर्ता नेमणुक करण्याचा प्रस्ताव मा.महासभेपुढे निर्णयास्तव ठेवणे योग्य. तसेच उपकर बसविणेचा दिनांक निश्चित करणेचा प्रस्ताव मा.महासभेपुढे निर्णयार्थ ठेवणे संयुक्तीक राहील. मान्यतेस्तव व आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (सा), यांचा अभिप्राय की, प्रस्तावित " अ " नुसार मान्यतेस्तव आदेशार्थ सादर.

**चर्चा :-**

सुरुवातीस मा.सौ. मालन ढोणे नगरसेविका यांनी जकाती विषयक वर्तमान पत्रात आलेल्या विविध बातम्यां बाबत प्रश्न उपस्थित करण्यांस उभे राहिले असता सुरुवातीस कार्यालयीन प्रस्ताव वाचुन

दाखविण्यांत यावा अशा बाबत मा.श्री. संदीप कोतकर माजी महापौर व नगरसेवक अरुण काका जगताप सांगितले असता सदरचा कार्यालयीन प्रस्ताव वाचुन दाखविण्यांत आला. व त्यानंतर प्रस्तावावर चर्चा सुरु झाली.

मा.श्री.बाळासाहेब पवार :- यांनी चर्चेत भाग घेतांना सांगितले की, आजच्या विषय पत्रिकेवर महत्वाचा विषय हा आहे की, आपल्याला जकात कर लावायचा की, उपकर लावावयाचा याचानिर्णय आपण घ्यावयाचा आहे. शहरातील व्यापा-यांची सभा घेतली असता जकात किंवा उपकर याबाबत चर्चा केली असता व्यापारी यांनी जकात कर लागु केला तर चांगले राहील असे सांगितले. उपकर फार अडचणीचा व जाचक आहे. उपकरा बाबत कर्मचारी प्रशिक्षीत नाहीत. त्यामुळे जकात कर लावण्यास व त्याबाबत ठेका देण्यास व्यापारी यांनी सहमती दर्शविलेली आहे.

मा.श्रीमती.मालन ढोणे :- सभागृहामध्ये वर्तमान पत्रातील बातम्या वरुन दिनांक १६ जानेवारी २००९ च्या वर्तमान पत्रामध्ये महानगरपालिकेचे जकातीचे उत्पन्न मोठया प्रमाणावर घटलेले आहे. यामध्ये पदाधिकारी यांचा हस्तक्षेप आहे किंवा कसे ? काही ठिकाणी बनावट पावत्या दिल्या जातात काय ? त्यामुळे काही कर्मचारी निलंबित केले आहे हे म्हणणे खरे आहे काय ? जकातीचे दररोजचे उत्पन्न १४ लाखावरुन ५ ते ७ लाखावर आलेले आहे. ३ कोटीची जकात कमी मिळत आहे. एकंदर ३० कोटी जकात कमी झालेली आहे किंवा कसे ? सदरच्या संपुर्ण माहिती बाबतचा खुलासा मागितला होता तेंव्हा सभेपुढे सदरचा खुलासा करावा.

मा.श्री.अरुण काका जगताप :- सदर बाबत मा.श्रीमती.ढोणे यांनी उपस्थित केलेल्या मुद्याबाबत प्रशासनाने जकातीतील गैरप्रकारा बाबत खुलासा करावा असे सांगितले. यावर उपायुक्त प्रशासन श्री.हांगे यांनी खुलासा केला तत्पुर्वी नवनिर्वाचित प्रथम सभेतील मा.महापौर श्री.सग्राम जगताप तसेच सर्व नवनिर्वाचित सदस्य यांचे स्वागत व अभिनंदन केले. त्यानंतर सभेपुढे जकातीचे उत्पन्न का कमी झाले याबाबत खालील प्रमाणे खुलासा केला.

खुलासा करतांना त्यांनी सांगितले की, उत्पन्न घटले आहे हे म्हणणे बरोबर आहे तथापि त्याची कारणे गैरप्रकार नाही तर जागतिक मंदीमुळे एकुणच व्यापारी उलाढाल घटलेली असल्यामुळे मालाची आवक कमी झालेली आहे. त्यामुळे तफावत पडलेली आहे. उदा - पेट्रोलच्या एका टँकरवर १८ हजार जकात ऐवजी १२ हजार मिळू लागली. ५२ रु. किलो असलेले स्टील २८ रु. किलो झाले. सिमेंटचे भावही उतरले. या प्रमाणे मोठया महागडया वस्तुच्या दरात घसरण झालेली असल्यामुळे जकातीचे उत्पन्न घटलेले आहे. वस्तुस्थितीची अशी कारणे आहेत. त्याचप्रमाणे जकात विभागाकडील काही गैरप्रकारामध्ये दोषी आढळलेल्या १० जणांना निलंबित केले आहे. ब-याच जणांच्या बदल्या केल्या आहेत. तसेच दंड आकारण्याच्या ११६ केसेस मधुन १३,६९,९७८/- इतकी दंडासह जकात वसुली केली आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- यांनी जकात चोरीच्या संदर्भामध्ये आकारण्यांत येणा-या दंडामध्ये सवलत दिली जात आहे.

मा.श्री.विनित पाउुलबुधे :- मा.आयुक्त सा़ो, आपण जे आता म्हणालात त्यात मा.सदस्यांनी व काही पदाधिका-यांनी जकाती बाबत हस्तक्षेप केला आहे. त्यानुसार आपण जे पदाधिकारी व सदस्य यांनी हस्तक्षेप केला त्यांची नावे सभेत जाहीर करावीत अन्यथा बेछुट आरोप करु नयेत.

यावर उपायुक्त यांनी खुलासा केला की, मा.आयुक्त यांच्या अधिकारामध्ये किमान ४ पट ते जास्तीत जास्त १० पट अशी परिस्थितीनुसार आकारणी केली जाते असे सांगितले. त्यानंतर या चर्चेमध्ये माजी महापौर श्री.संदीप कोतकर, यांनी प्रश्न उपस्थित केले.

मा.श्री.संदीप कोतकर, माजी महापौर :- मागील वर्षी जकात ठेकेदार यांनी ४७ कोटी १६ लाख जकातीची रक्कम दिलेली होती. मागील आर्थिक वर्षामध्ये १० महिन्यामध्ये वसुल व्हावयाची रक्कम ही ४७ कोटी १६ लाख भागीले १२ महिने याप्रमाणात वसुल व्हावयास पाहिजे होती.

यावर उपायुक्त यांनी खुलासा केला की, १८ जानेवारी २००९ अखेर ३५ कोटी ६३ लाख वसुल झालेला आहे. व मार्च अखेरपर्यंत ४२ कोटी जकात वसुल होवु शकेल असे सांगितले.

यावर मा.श्री.अरुण काका जगताप यांनी मुद्दा उपस्थित केला की, सदर आर्थिक वर्षात ठेका का दिलेला नव्हता त्यावर खुलासा करण्यांत आला की, सदर वेळी निविदा काढलेल्या होत्या. असा खुलासा केल्यानंतर वसुल व्हावयास पाहिजे होता असे जगताप यांनी सांगितले.

मा.श्री.संदीप कोतकर, माजी महापौर :- ६ कोटीचे उत्पन्न महानगरपालिकेला कमी झालेले आहे. याची जबाबदारी कोणाची आहे. याबाबत कार्यवाही झाली पाहिजे अशी सूचना केली.

मा.श्री.बाळासाहेब पवार :- मागील आर्थिक वर्षामध्ये सन २००७-२००८ या कालावधीमध्ये ४२ कोटी ६१ लाख ४५ हजार देकार रक्कम असतांना हमी कर्त्यांनी ४७ कोटी १६ लाखाला ठेका घेतला होता. आता किमान देकार रक्कम ४७ कोटी वरुन अपेक्षित ५२ कोटी करण्यांत आली आहे.

आर्थिक वर्षातील १० महिने कालावधी बघीतला असता अपेक्षित उत्पन्नामध्ये ६ कोटी उत्पन्न घटले आहे यास वेगवेगळी कारणे आहेत. जागतिक मंदीची लाट असल्यामुळे उत्पन्न घटले आहे. आताही ठेका दिला पाहिजे व अपेक्षित उत्पन्न मिळाले पाहिजे अन्यथा महानगरपालिका कर्मचा-यांचे पगारही होणे शक्य नाही. तरी याबाबत निर्णय घ्यावा. सध्या नविन बजेट मंजूर नसल्यामुळे आता चालू पुढील आर्थिक वर्षासाठी ठेका देतांना किती रक्कमेवर गेला पाहिजे याचा विचार केला पाहिजे.

मा.श्री.शेख नजीर :- प्रशासनाने ५८ कोटीचा देकार कमी करण्याकरीता व शहरातील व्यापार वाढला पाहिजे. जकातीचा मोठा ठेका दिला तर तो भरण्यासाठी कोणी पुढे येणार नाही असे मत दिले. त्यासाठी ४८ कोटी ११ हजार अशी रक्कम निश्चीत करावी असा प्रस्ताव मांडला त्यास मा.श्री.अरुण काका जगताप यांनी अनुमोदन दिले.

मा.श्री.लोंढे :- चर्चेत भाग घेतला व विचारणा केली की, स्थायी समिती अस्तित्वात आहे का ?

मा.आयुक्त :- अहमदनगर महानगरपालिकेची विशेष सभा आहे असे सांगितले.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- जकातीसाठी ठरविण्यांत आलेली देकार रक्कम रु.५८ कोटी १६ लाख ३६ हजार ऐवजी रु. ४८ कोटी ११ हजार इतकी कमी करता येते काय ? त्यास कायदेशिर आधार काय ? जेणेकरुन भविष्यात कायदेशिर बाबींना तोंड द्यावे लागु नये याचा प्रशासनाने खुलासा करावा.

यावर मा.आयुक्त :- महानगरपालिकेने निर्धारीत केलेली रक्कम निश्चीत करणे आवश्यक आहे. शासनाने दिलेल्या पध्दतीनुसार व निर्देशानुसार रक्कम निर्धारीत करावयाची आहे.

यावर मा.श्री.अरुण काका जगताप :- सदर बाबत मुख्यलेखाधिकारी यांनी खुलासा करावा असे सुचित केले.

यावर मुख्यलेखाधिकारी श्री.कर्डीले यांनी खुलासा केला.

मा.श्री.अरुण काका जगताप :- जागतिक मंदीचा विचार करता व श्री.नजीर शेख यांनी मांडलेला प्रस्ताव विचार करता जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यास मी अनुमोदन देत आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- यांनी सुचविले की, जकात आणि उपकर दोन्हीही आम्हाला नको आहेत. देशभरामध्ये कोठेही जकात नाही. फक्त पारगमन कर ठेवावा त्याचे भरपुर उत्पन्न मिळेल व शासनाने व्हॅट

लागु केलेला असल्यामुळे शासनाने व्हॅट मधुन जकात रक्कमेची भरपाई करावी व अनुदान द्यावे असे सांगितले.

मा.श्री.धनंजय जाधव, निखील वारे इत्यादी यांनी जकाती बाबतचा विषय मंजूर झाला आहे. पुढील विषय घ्यावा असे सुचविले.

-- ** --

**ठराव :-** शासनाचे राजपत्र दिनांक १५/११/२००८ रोजीचे अधिसुचना नुसार अहमदनगर शहरामध्ये उपयोग, उपभोग, व विक्री यासाठी येणारे मालाचे प्रवेशा बाबत जकाती ऐवजी उपकर बसविण्यासंबधी स्थानिक परिस्थिती विचारात घेवून महानगरपालिकेने निर्णय घ्यावा असे कळविले आहे. महानगरपालिकेने अहमदनगर येथील स्थानिक व्यापारी यांची एक बैठक महानगरपालिका सभागृहात दि.७ जानेवारी २००९ रोजी घेतली असता,अहमदनगर शहरात उपकर लावण्यांस मोठया प्रमाणात विरोध असल्यामुळे याबाबत आजच्या सभेतील बैठकीत चर्चा होवून,सन २००९-२०१० या आर्थिक वर्षात उपकरा ऐवजी जकात कर लावण्यांस तसेच संबधीत जकात कराची वसुली खाजगी जकात अभिकर्ता मार्फत करण्यांस ही सभा बहुमताने मान्यता देत आहे.

तसेच कार्यालयीन प्रस्तावामध्ये जकातीची अपेक्षीत देकार रक्कम ५८ कोटी १६ लाख ३६ हजार धरलेली आहे. जागतिक मंदीमुळे विविध वस्तूंचे उदा-स्टील, डांबर, सिमेंट, डिझेल, पेट्रोल, गॅस, तांबे इ.सारख्या व जीवनावश्यक वस्तूंचे कमी झालेले बाजारभाव लक्षात घेता जकातपात्र मालाची आयात कमी झालेली असल्यामुळे जकात उत्पन्नावर त्याचा विपरीत परिणाम झालेला आहे. त्यामुळे सन २००९-२०१० या आर्थिक वर्षात करिता किमान देकार रक्कम रु. ४८ कोटी ११ हजार ही रक्कम सभा निश्चीत करीत आहे.

तसेच नविन प्रशासकीय इमारतीचे दुस-या मजल्याचे विस्तारीत बांधकामा करीता रक्कम रू. १ कोटी ४० लाख खर्चाची तयारी दर्शविणारे निविदाकाराचा तौलनिक अभ्यास करून त्या निविदेस प्राधान्य देण्या बाबत योग्य तो निर्णय घेण्यांत यावा यास ही सभा मान्यता देत आहे. जाहीर निविदा मागविणे प्रकियेस येणारा तदंनुषिक खर्च मंजूर. नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी

तथापि मा.सौ.काळे गितांजली सुनिल नगरसेविका तथा भाजपा गटनेता व मा.सौ.राठोड अनिता राजेंद्र नगरसेविका तथा शिवसेना गटनेता यांनी दिलेल्या दिनांक २०/०१/२००९ च्या पत्रान्वये सदर सभेस भाजपा-शिवसेना सदस्यांनी केलेल्या विरोधाची नोंद घेण्यांत येत आहे.

सदर ठरावातील अंतर्भुत निर्णय इतिवृत्त कायम होणेची वाट न पहाता त्वरीत अंमलात येईल.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब पवार.

अनुमोदक :- मा.श्री.विनित पाउलबुधे,

ठराव बहुमताने मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : २ दिनांक : २०-०१-२००९.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :-**

महाराष्ट्र शासनाचे नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांनी दिनांक १५ नोव्हेंबर २००८ रोजी अधिसुचनाव्दारे सुचित केल्यानुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीत स्थानिक परिस्थितीचा विचार करुन उपयोग, उपभोग किंवा विक्री यासाठी शहरामध्ये होणा-या मालाच्या प्रवेशावर जकाती ऐवजी उपकर बसविण्याचा दिनांक निश्चित करण्याचा उचित निर्णय घेणे बाबत...

**-- ** --**

**ठराव :-**

शासनाचे राजपत्र दिनांक १५/११/२००८ रोजीचे अधिसुचना नुसार अहमदनगर शहरामध्ये उपयोग, उपभोग, व विक्री यासाठी येणारे मालाचे प्रवेशा बाबत जकाती ऐवजी उपकर बसविण्या संबधी स्थानिक परिस्थिती विचारात घेवून महानगरपालिकेने निर्णय घ्यावा असे कळविले आहे. महानगरपालिकेने अहमदनगर येथील स्थानिक व्यापारी यांची एक बैठक महानगरपालिका सभागृहात दि.७ जानेवारी २००९ रोजी घेतली असता,अहमदनगर शहरात उपकर लावण्यांस मोठया प्रमाणात विरोध असल्यामुळे याबाबत आजच्या सभेतील बैठकीत चर्चा होवून,सन २००९-२०१० या आर्थिक वर्षात उपकरा ऐवजी जकात कर लावण्यांस तसेच संबधीत जकात कराची वसुली खाजगी जकात अभिकर्ता मार्फत करण्यांस ही सभा बहुमताने मान्यता देत आहे.

तसेच कार्यालयीन प्रस्तावामध्ये जकातीची अपेक्षीत देकार रक्कम ५८ कोटी १६ लाख ३६ हजार धरलेली आहे. जागतिक मंदीमुळे विविध वस्तूंचे उदा-स्टील, डांबर, सिमेंट, डिझेल, पेट्रोल, गॅस, तांबे इ.सारख्या व जीवनावश्यक वस्तूंचे कमी झालेले बाजारभाव लक्षात घेता जकातपात्र मालाची आयात कमी झालेली असल्यामुळे जकात उत्पन्नावर त्याचा विपरीत परिणाम झालेला आहे. त्यामुळे सन २००९-२०१० या आर्थिक वर्षात करिता किमान देकार रक्कम रु. ४८ कोटी ११ हजार ही रक्कम सभा निश्चीत करीत आहे.

तसेच नविन प्रशासकीय इमारतीचे दुस-या मजल्याचे विस्तारीत बांधकामा करीता रक्कम रू. १ कोटी ४० लाख खर्चाची तयारी दर्शविणारे निविदाकाराचा तौलनिक अभ्यास करून त्या निविदेस प्राधान्य देण्या बाबत योग्य तो निर्णय घेण्यांत यावा यास ही सभा मान्यता देत आहे. जाहीर निविदा मागविणे प्रकियेस येणारा तदंनुषिक खर्च मंजूर. नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी

तथापि मा.सौ.काळे गितांजली सुनिल नगरसेविका तथा भाजपा गटनेता व मा.सौ.राठोड अनिता राजेंद्र नगरसेविका तथा शिवसेना गटनेता यांनी दिलेल्या दिनांक २०/०१/२००९ च्या पत्रान्वये सदर सभेस भाजपा-शिवसेना सदस्यांनी केलेल्या विरोधाची नोंद घेण्यांत येत आहे.

सदर ठरावातील अंतर्भुत निर्णय इतिवृत्त कायम होणेची वाट न पहाता त्वरीत अंमलात येईल.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब पवार.

अनुमोदक :- मा.श्री.विनित पाउलबुधे,

ठराव बहुमताने मंजूर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**दिनांक २०/०१/२००९ रोजी जकात ठेका विषयक खास सभेतील चर्चा :-**

सुरुवातीस मालन ढोणे नगरसेविका यांनी जकाती विषयक वर्तमान पत्रात आलेल्या विविध बातम्यां बाबत प्रश्न उपस्थित करण्यांस उभे राहिले असता सुरुवातीस कार्यालयीन प्रस्ताव वाचुन दाखविण्यांत यावा
अशा बाबत मा.श्री. संदीप कोतकर माजी महापौर व नगरसेवक अरुण काका जगताप सांगितले असता सदरचा कार्यालयीन प्रस्ताव वाचुन दाखविण्यांत आला. व त्यानंतर प्रस्तावावर चर्चा सुरु झाली.

मा.श्री.बाळासाहेब पवार :- यांनी चर्चेत भाग घेतांना सांगितले की, आजच्या विषय पत्रिकेवर महत्वाचा विषय हा आहे की, आपल्याला जकात कर लावायचा की, उपकर लावावयाचा याचानिर्णय आपण घ्यावयाचा आहे. शहरातील व्यापा-यांची सभा घेतली असता जकात किंवा उपकर याबाबत चर्चा केली असता व्यापारी यांनी जकात कर लागु केला तर चांगले राहील असे सांगितले. उपकर फार अडचणीचा व जाचक आहे. उपकरा बाबत कर्मचारी प्रशिक्षीत नाहीत. त्यामुळे जकात कर लावण्यास व त्याबाबत ठेका देण्यास व्यापारी यांनी सहमती दर्शविलेली आहे.

मा.श्रीमती.मालन ढोणे :- सभागृहामध्ये वर्तमान पत्रातील बातम्या वरुन दिनांक १६ जानेवारी २००९ च्या वर्तमान पत्रामध्ये महानगरपालिकेचे जकातीचे उत्पन्न मोठया प्रमाणावर घटलेले आहे. यामध्ये पदाधिकारी यांचा हस्तक्षेप आहे किंवा कसे ? काही ठिकाणी बनावट पावत्या दिल्या जातात काय ? त्यामुळे काही कर्मचारी निलंबित केले आहे हे म्हणणे खरे आहे काय ? जकातीचे दररोजचे उत्पन्न १४ लाखावरुन ५ ते ७ लाखावर आलेले आहे. ३ कोटीची जकात कमी मिळत आहे. एकंदर ३० कोटी जकात कमी झालेली आहे किंवा कसे ? सदरच्या संपुर्ण माहिती बाबतचा खुलासा मागितला होता तेंव्हा सभेपुढे सदरचा खुलासा करावा.

मा.श्री.अरुण काका जगताप :- सदर बाबत मा.श्रीमती.ढोणे यांनी उपस्थित केलेल्या मुद्याबाबत प्रशासनाने जकातीतील गैरप्रकारा बाबत खुलासा करावा असे सांगितले. यावर उपायुक्त प्रशासन श्री.हांगे यांनी खुलासा केला तत्पुर्वी नवनिर्वाचित प्रथम सभेतील मा.महापौर श्री.सग्राम जगताप तसेच सर्व नवनिर्वाचित सदस्य यांचे स्वागत व अभिनंदन केले. त्यानंतर सभेपुढे जकातीचे उत्पन्न का कमी झाले याबाबत खालील प्रमाणे खुलासा केला.

खुलासा करतांना त्यांनी सांगितले की, उत्पन्न घटले आहे हे म्हणणे बरोबर आहे तथापि त्याची कारणे गैरप्रकार नाही तर जागतिक मंदीमुळे एकुणच व्यापारी उलाढाल घटलेली असल्यामुळे मालाची आवक कमी झ ाालेली आहे. त्यामुळे तफावत पडलेली आहे. उदा - पेट्रोलच्या एका टँकरवर १८ हजार जकात ऐवजी १२ हजार मिळू लागली. ५२ रु. किलो असलेले स्टील २८ रु. किलो झाले. सिमेंटचे भावही उतरले. या प्रमाणे मोठया महागडया वस्तुच्या दरात घसरण झालेली असल्यामुळे जकातीचे उत्पन्न घटलेले आहे. वस्तुस्थितीची अशी कारणे आहेत. त्याचप्रमाणे जकात विभागाकडील काही गैरप्रकारामध्ये दोषी आढळलेल्या १० जणांना निलंबित केले आहे. ब-याच जणांच्या बदल्या केल्या आहेत. तसेच दंड आकारण्याच्या ११६ केसेस मधुन १३,६९,९७८/- इतकी दंडासह जकात वसुली केली आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- यांनी जकात चोरीच्या संदर्भामध्ये आकारण्यांत येणा-या दंडामध्ये सवलत दिली जात आहे.

मा.श्री.विनित पाउलबुधे :- मा.आयुक्त साो, आपण जे आता म्हणालात त्यात मा.सदस्यांनी व काही पदाधिका-यांनी जकाती बाबत हस्तक्षेप केला आहे. त्यानुसार आपण जे पदाधिकारी व सदस्य यांनी हस्तक्षेप केला त्यांची नावे सभेत जाहीर करावीत अन्यथा बेछुट आरोप करु नयेत.

यावर उपायुक्त यांनी खुलासा केला की, मा.आयुक्त यांच्या अधिकारामध्ये किमान ४ पट ते जास्तीत जास्त १० पट अशी परिस्थितीनुसार आकारणी केली जाते असे सांगितले. त्यानंतर या चर्चेमध्ये माजी महापौर श्री.संदीप कोतकर, यांनी प्रश्न उपस्थित केले.

मा.श्री.संदीप कोतकर, माजी महापौर :- मागील वर्षी जकात ठेकेदार यांनी ४७ कोटी १६ लाख जकातीची रक्कम दिलेली होती. मागील आर्थिक वर्षामध्ये १० महिन्यामध्ये वसुल व्हावयाची रक्कम ही ४७ कोटी १६ लाख भागीले १२ महिने याप्रमाणात वसुल व्हावयास पाहिजे होती.

यावर उपायुक्त यांनी खुलासा केला की, १८ जानेवारी २००९ अखेर ३५ कोटी ६३ लाख वसुल झालेला आहे. व मार्च अखेरपर्यंत ४२ कोटी जकात वसुल होवु शकेल असे सांगितले.

यावर मा.श्री.अरुण काका जगताप यांनी मुद्दा उपस्थित केला की, सदर आर्थिक वर्षात ठेका का दिलेला नव्हता त्यावर खुलासा करण्यांत आला की, सदर वेळी निविदा काढलेल्या होत्या. असा खुलासा केल्यानंतर वसुल व्हावयास पाहिजे होता असे जगताप यांनी सांगितले.

मा.श्री.संदीप कोतकर, माजी महापौर :- ६ कोटीचे उत्पन्न महानगरपालिकेला कमी झालेले आहे. याची जबाबदारी कोणाची आहे. याबाबत कार्यवाही झाली पाहिजे अशी सूचना केली.

मा.श्री.बाळासाहेब पवार :- मागील आर्थिक वर्षामध्ये सन २००७-२००८ या कालावधीमध्ये ४२ कोटी ६१ लाख ४५ हजार देकार रक्कम असतांना हमी कर्त्यांनी ४७ कोटी १६ लाखाला ठेका घेतला होता. आता किमान देकार रक्कम ४७ कोटी वरुन अपेक्षित ५२ कोटी करण्यांत आली आहे.

आर्थिक वर्षातील १० महिने कालावधी बघीतला असता अपेक्षित उत्पन्नामध्ये ६ कोटी उत्पन्न घटले आहे यास वेगवेगळी कारणे आहेत. जागतिक मंदीची लाट असल्यामुळे उत्पन्न घटले आहे. आताही ठेका दिला पाहिजे व अपेक्षित उत्पन्न मिळाले पाहिजे अन्यथा महानगरपालिका कर्मचा-यांचे पगारही होणे शक्य नाही. तरी याबाबत निर्णय घ्यावा. सध्या नविन बजेट मंजूर नसल्यामुळे आता चालू पुढील आर्थिक वर्षासाठी ठेका देतांना किती रक्कमेवर गेला पाहिजे याचा विचार केला पाहिजे.

मा.श्री.शेख नजीर :- प्रशासनाने ५८ कोटीचा देकार कमी करण्याकरीता व शहरातील व्यापार वाढला पाहिजे. जकातीचा मोठा ठेका दिला तर तो भरण्यासाठी कोणी पुढे येणार नाही असे मत दिले. त्यासाठी ४८ कोटी ११ हजार अशी रक्कम निश्चीत करावी असा प्रस्ताव मांडला त्यास मा.श्री.अरुण काका जगताप यांनी अनुमोदन दिले.

मा.श्री.लोंढे :- चर्चेत भाग घेतला व विचारणा केली की, स्थायी समिती अस्तित्वात आहे का ?

मा.आयुक्त :- अहमदनगर महानगरपालिकेची विशेष सभा आहे असे सांगितले.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- जकातीसाठी ठरविण्यांत आलेली देकार रक्कम रु.५८ कोटी १६ लाख ३६ हजार ऐवजी रु. ४८ कोटी ११ हजार इतकी कमी करता येते काय ? त्यास कायदेशिर आधार काय ? जेणेकरुन भविष्यात कायदेशिर बाबींना तोंड द्यावे लागु नये याचा प्रशासनाने खुलासा करावा.

यावर मा.आयुक्त :- महानगरपालिकेने निर्धारीत केलेली रक्कम निश्चीत करणे आवश्यक आहे. शासनाने दिलेल्या पध्दतीनुसार व निर्देशानुसार रक्कम निर्धारीत करावयाची आहे.

यावर मा.श्री.अरुण काका जगताप :- सदर बाबत मुख्यलेखाधिकारी यांनी खुलासा करावा असे सुचित केले.

यावर मुख्यलेखाधिकारी श्री.कर्डीले यांनी खुलासा केला.

मा.श्री.अरुण काका जगताप :- जागतिक मंदीचा विचार करता व श्री.नजीर शेख यांनी मांडलेला प्रस्ताव विचार करता जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यास मी अनुमोदन देत आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- यांनी सुचविले की, जकात आणि उपकर दोन्हीही आम्हाला नको आहेत. देशभरामध्ये कोठेही जकात नाही. फक्त पारगमन कर ठेवावा त्याचे भरपुर उत्पन्न मिळेल व शासनाने व्हॅट लागु केलेला असल्यामुळे शासनाने व्हॅट मधुन जकात रक्कमेची भरपाई करावी व अनुदान द्यावे असे सांगितले.

मा.श्री.धनंजय जाधव, निखील वारे इत्यादी यांनी जकाती बाबतचा विषय मंजूर झाला आहे. पुढील विषय घ्यावा असे सुचविले.